उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग सहसंचालक, गट-अ (एस-२५, रु.७८८०० - २०९२००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन आदेश क्रमांकः पदोन्न-२०२६/प्र.क्र.२८/उद्योग-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २२ जुलै,२०२६.

**वाचा :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१
२) उद्योग संचालनालयाचे यांचे पत्र क्रमांक: उसं/आस्था/पदो/उससं/२०२५-२६/ए-९५, दि.२९.०१.२०२६
३) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्रमांक: ईएसबी-११२६/प्र.क्र.१५/आस्थामं, दि.३०.०४.२०२६

**शासन आदेश:**

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिक्षकीय उद्योग अधिकारी, गट-अ संवर्गातील खालील नमूद अधिका-यांना सन २०२५-२६ या निवडसुची वर्षाकरिता उद्योग सहसंचालक, गट-अ (वेतन मॅट्रिक्स स्तर एस-२५, रु.७८८००-२०९२००) या संवर्गात या शासन आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदोन्नतीनंतरची पदस्थापना कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. अजयकुमार ता. पाटील | उद्योग सहसंचालक, मुख्यालय, मुंबई | रिक्त पदावर |

२. वरील अधिका-यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(१) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नती कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब यांच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील व पदोन्नतीसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

(३) सदर निवडसूचीतील सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असलेल्या, तथापि पदोन्नती नाकारलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३. श्री. पाटील यांना त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी याद्वारे एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांनी पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी विहित मुदतीत रुजु व्हावे व त्याबाबतचा रुजू अहवाल संबंधित पदोन्नत अधिका-यांनी विकास आयुक्त (उद्योग) यांच्यामार्फत शासनास सादर करावा. तसेच त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली,२०२१ मधील २ (ड) नुसार पदोन्नतीने नियुक्ती होणा-या सदर अधिका-यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजु होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रुजु न झाल्यास संबंधित अधिका-याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन ( dias non) म्हणुन गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१३०९५१९८५२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR SHRIKANT
LAXMANRAO
PULKUNDWAR

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=FEB24B5F5D1512BB47F7BAE5AD1DB4953358CD43C999BDF0814C6BB78364D50A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.07.22 13:13:03 +05'30'

**(डॉ.श्री.ल.पुलकुंडवार)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन इमारत, मुंबई ४०० ०३२
५. महालेखापाल कार्यालय (ले. व अ.)/(ले.प.), मुंबई
६. सर्व सह/उपसचिव (उद्योग),उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. संबंधित पदोन्नत अधिकारी (उद्योग संचालनालयामार्फत)
९. निवड नस्ती